MHYA180003242022

| | |
|---|---|
| दाखल तारीख | – ०५.०३.२०२२ |
| नोंदणी तारीख | – ०५.०३.२०२२ |
| निकाल तारीख | – २२.०५.२०२६ |
| कालावधी | – वर्ष ०४ महिने ०२ दिवस १७ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय, घाटंजी, जि. यवतमाळ**

(पिठासीन अधिकारी – पी.आर.पाटील)

**कौ.हिं.म.सं.अर्ज क्र. ३/२०२२** **नि.क्र.१८**

**अर्जदार** – सौ. भाग्यश्री प्रशांत तायवाडे,
वय–२४ वर्ष, व्यवसाय–घरकाम,
रा.व्दारा श्री. पुंडलीकराव शंकरराव गावंडे,
दुर्गामाता वार्ड, घाटंजी, ता. घाटंजी, जि. यवतमाळ.

...*विरुध्द*....

**गैरअर्जदार** – १. प्रशांत जगदिश तायवाडे,
वय–३१ वर्ष, व्यवसाय– खाजगी ठेकेदारी,

२. जगदिश नागोरावजी तायवाडे,
वय– सज्ञान, व्यवसाय– खाजगी,

३. सौ. रत्नमाला जगदिश तायवाडे,
वय– सज्ञान, व्यवसाय– घरकाम,

४. गोलु उर्फ अविनाश जगदिश तायवाडे,
वय– सज्ञान, व्यवसाय– खाजगी नोकरी,
गै.अ.क्र. १ ते ४ रा. अमदोरी,
ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती.

५. सौ. रोशनी निलेश पिंपळकार,
वय– सज्ञान, व्यवसाय–घरकाम,
रा. बोदडी, ता. घाटंजी, जि. यवतमाळ.

---

**अर्जदारातर्फे वकील श्री. एन. पी. चवरडोल.**
**गैरअर्जदारांतर्फे वकील श्री. ए. एच. पांडे.**

---

## – न्यायनिर्णय –

(दिनांक २२.०५.२०२६ रोजी घोषित)

अर्जदाराने सदरचा अर्ज घरगुती हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम १२, १७, १८, १९, २० व २२ अंतर्गत दाखल केलेला आहे.

२. **अर्जदाराचे थोडक्यात कथन येणेप्रमाणे,**

अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ हे पती पत्नी असुन त्यांचा विवाह समाजातील जाती रितीरिवाजाप्रमाणे दि. १७.०४.२०१९ रोजी मौजा अमदोरी, ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती येथे संपन्न झाला. गैरअर्जदार क्र. २ व ३ हे अर्जदाराचे सासु व सासरे असुन गैरअर्जदार क्र. ४ हा गैरअर्जदार क्र. १ चा भाउ असुन गैरअर्जदार क्र. ५ हि गैरअर्जदार क्र. १ ची बहिण आहे. गैरअर्जदार क्र. ५ हिचे लग्न झाले असुन ती तीच्या सासरी राहते. मात्र ती नेहमी तीच्या माहेरी अमदोरी येथे येत असते. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांना विवाह संबंधातुन कोणतेही अपत्य झालेले नाही.

३. लग्नानंतर अर्जदार हि गैरअर्जदारांकडे सुन म्हणुन नांदावयास गेली असता तीने गैरअर्जदारांच्या घरची संपुर्ण जबाबदारी स्वत:वर घेतली. ती गैरअर्जदारांचा यथोचित मानसन्मान करीत होती. गैरअर्जदारांनी अर्जदार हिला सुरूवातीचे दहा ते बारा दिवस चांगले वागविले. मात्र त्यानंतर गैरअर्जदार क्र. ३ हि अर्जदार हिला तुला स्वयंपाक करता येत नाही, घरातील कामे नीट करता येत नाही, तुझ्या आईने तुला शिकविले नाही काय अशी सतत टोमणे मारायची. तसेच गैरअर्जदार क्र. ५ सुध्दा अर्जदार हिला लहान सहान कारणावरून तसेच तीच्या आई वडीलांवरून बोलत असे. गैरअर्जदार क्र. २ व ३ हे अर्जदार हिला तीच्या आई वडीलांनी लग्नात हुंडा दिला नाही म्हणुन माहेरहुन १,००,०००/– रूपये आणण्यासाठी तगादा लावत होते. गैरअर्जदार क्र. २ व ३ हे गैरअर्जदार क्र. १ ला अर्जदाराविरूध्द भडकावीत असे व गैरअर्जदार क्र. १ हा त्यावरून अर्जदार हिला मारहान करीत असे. गैरअर्जदारांच्या स्वभावात आज ना उद्या बदल पडेल या आशेने अर्जदार गैरअर्जदारांकडे नांदत होती.

४. लग्न झाल्यापासुन गैरअर्जदार क्र. ५ हि माहेरीच राहत होती व ती सुध्दा गैरअर्जदार क्र. १ ला अर्जदार हिच्या विरूध्द भडकावीत होती व गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराला मारहान करीत असे व गैरअर्जदार क्र. ५ हिला आनंद होत असे.

गैरअर्जदार क्र. ४ हा सुध्दा इतर गैरअर्जदारांना अर्जदाराविरूध्द भडकावीत असे. अर्जदाराने सदरची बाब तीच्या आई वडीलांना सांगितल्यावर त्यांनी तीची समजुत काढली होती. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार हिला तीच्या आई वडीलांनी तीला लग्नात दिलेली पाच ग्रॅम सोन्याची अंगठी घेवुन गेली. मात्र तीला सदर अंगठी परत न दिल्याने अर्जदार हिने दि. २०.०६.२०१९ रोजी गैरअर्जदार क्र. १ ला अंगठी बाबत विचारणा केली असता गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार हिला बेदम मारहान केली. सदरची बाब अर्जदार हिने तीच्या वडीलांना फोनवर सांगितली असता तीचे वडील सासरी आली व त्यांनी गैरअर्जदारांना मारहान का केली असे विचारले असता गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी जर तुमच्या मुलीला नांदावयाचे असेल तर १,००,०००/– रूपये घेवुन तीला पाठवा असे म्हणुन अर्जदार हिला तीच्या वडीलासोबत घरातुन हाकलुन दिले. तेव्हापासुन तर आजरोजीपर्यंत अर्जदार हि तीच्या आई वडीलांच्या दयेवर तीच्या माहेरी राहत आहे. अर्जदार हिचे स्त्रीधन, सोन्याची अंगठी ५ ग्रॅम, सोन्याची पोत ७ ग्रॅम हे दागिने व तीला लग्नात मिळालेल्या संपुर्ण भेटवस्तु हया आजरोजी गैरअर्जदारांकडेच आहे. त्यानंर सुध्दा अर्जदार व तीच्या वडीलांनी गैरअर्जदारांना समजविण्याचा अनेकदा प्रयत्न केला. तसेच अर्जदारांचे वडील हे गुलाब तुकाराम वाघ व गोपाल बाळकृष्ण दिकुंडवार यांना घेवुन गैरअर्जदारांना समजविण्याकरीता अमदोरी येथे गेले असता गैरअर्जदारांच्या वागणुकीत कोणताही फरक पडला नाही व ते १,००,०००/– रूपयांच्या हुंडयांच्या मागणीवर ठाम राहिले.

५. गैरअर्जदार यांनी दिलेल्या कौटुंबिक हिंसाचारामुळे अर्जदार हि तीचे इच्छेविरूध्द तीच्या माहेरी वडीलांच्या दयेवर जिवन जगत आहे. अर्जदार हिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसुन गैरअर्जदार क्र. १ हा पती म्हणुन तीला तीच्या जिवनावश्यक गरजा भागविण्याकरीता तसेच इतर खर्चाकरीता खावटी देण्यास पात्र आहे. गैरअर्जदार क्र. १ हा खाजगी ठेकेदारीचा व्यवसाय करतो व तो दर महिन्याकाठी ५० ते ६० हजर महिना कमवितो. तसेच त्याच्या वडीलांच्या नावे असलेली मौजा अमदोरी येथील शेती सुध्दा करतो व त्यामधुन तो वार्षीक ३ ते ४ लाख रूपये नफा कमवितो. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार हिला सहज मासिक २०,०००/– रूपये खावटी देवु शकतो. तसेच अर्जदाराने गैरअर्जदारांविरूध्द संरक्षणाच्या आदेशाची मागणी केली आहे. तसेच गैरअर्जदारांनी अर्जदाराला दिलेल्या मानसिक व शारीरीक छळाबाबत नुकसान भरपाई म्हणुन २,००,०००/– रूपयाची मागणी केलेली आहे.

६. गैरअर्जदार हे सदर प्रकरणात हजर होवुन त्यांच्या अधिवक्त्यांमार्फत नि.क्र.१० वर त्यांचा लेखी जबाब दाखल करून अर्जदाराने तिच्या अर्जात

त्यांच्याविरूध्द लावलेले सर्व आरोप फेटाळले. गैरअर्जदारांनी अर्जदार हिच्या वडीलांनी लग्नात सोन्याचे दागिने तसेच भेट वस्तु दिल्याचे नाकारले. तसेच गैरअर्जदार क्र. १ ते ५ हे एकत्र कुटुंबात राहत असल्याचे देखील त्यांनी नाकारले. गैरअर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार हि सुरूवातीपासुनच गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांच्यासोबत चांगली राहिली नाही. तसेच ती विनाकारण त्यांच्यासोबत नेहमी भांडण करीत होती व गैरअर्जदार क्र. १ याला नेहमी म्हणत होती की, तु मला पसंत नाही, माझ्या घरच्यांनी तुझ्यासोबत माझे जबरदस्तीने लग्न लावले आहे. तसेच तीला खेडयात राहायचे नसुन चांदुर रेल्वे येथे राहायचे आहे असे गैरअर्जदार क्र. १ ला नेहमी म्हणत होती. अर्जदार हि घरातील कोणतेही काम करीत नव्हती. तसेच ती तासनतास नेहमी फोनवर बोलत होती व याबाबत गैरअर्जदारांनी तीला विचारणा केली असता ती नेहमी भांडत होती.

७. दि. २२.०६.२०१९ रोजी अर्जदार हिने विनाकारण गैरअर्जदारांसोबत भांडण केले व तीच्या अंगावरील तीचे संपुर्ण सोन्या चांदीचे दागिने, कपडे घेवुन तीच्या माहेरी निघुन गेली व तेव्हापासुन ती स्वइच्छेने तीच्या माहेरी राहत आहे. गैरअर्जदारांनी अर्जदाराला कधीही कोणत्याही प्रकारचा त्रास दिलेला नाही. गैरअर्जदार हा आजही अर्जदार हिला नांदावयास तयार असुन अर्जदार हि स्वतःच्या इच्छेने तीच्या माहेरी राहत आहे. त्यामुळे तीला गैरअर्जदारांकडुन कोणतीही मागणी करण्याचा कायदेशीर अधिकार नाही. गैरअर्जदार क्र. १ ची आर्थीक परिस्थिती बेताची असुन तो मजुरी करतो व त्याचे व इतर गैरअर्जदारांचे पोट भरत असतो. याउलट अर्जदार हि सुशिक्षीत असुन ती खाजगी नोकरी करते व तीला उत्पन्नाचे साधन आहे. त्यामुळे गैरअर्जदारांनी अर्जदार हिचा अर्ज खारिज करण्याची विनंती केली.

**<u>अभिलेखावरील पुरावा :</u>**

८. अर्जदार हिने साक्षीदार क्र. १ म्हणुन स्वतःच्या पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. १३ वर दाखल केले व नि.क्र. १७ वर पुरसिस दाखल करून अर्जदाराने तिचा पुरावा बंद केला.

९. अर्जदार हिने तिच्या अर्जाच्या व पुराव्याचे पुष्टर्थ खालील कागदपत्र दाखल केलेले आहे.

| अ.क्र. | कागदपत्राचे स्वरूप | नि.क्र. |
|---|---|---|
| १ | मक्ता व दायित्वाचे शपथपत्र | १६ |

१०. गैरअर्जदार यांना वांरवार संधी देवुनही ते न्यायालयासमक्ष हजर होवुन पुरावा देण्यास असमर्थ ठरल्याने विद्यमान न्यायालयाने दि. १०.०३.२०२६ रोजी नि.क्र. १ वर आदेश पारीत करून गैरअर्जदारांचा पुरावा बंद केला आहे.

११. अर्जदार व गैरअर्जदारांतर्फे त्यांच्या अधिवक्त्यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

१२. अर्जदाराचा अर्ज, गैरअर्जदारांचा लेखी जबाब तसेच अभिलेखावरील पुरावा व युक्तीवाद ऐकता खालील वादप्रश्न निर्माण झाले असुन मी त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह नोंदवित आहोत, ते पुढीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **उत्तर** |
|---|---|---|
| १ | अर्जदार हि सिध्द करते काय की, गैरअर्जदारांनी तिचा शारीरीक, मानसिक व आर्थीक छळ करून तिला कौटुंबिक हिंसाचाराची वागणुक दिली ? | होय. |
| २ | अर्जदार हि सिध्द करते काय की, ती गैरअर्जदार क्र. १ पासुन मासिक २०,०००/- रूपये खावटी मिळण्यास पात्र आहे ? | अंशत: होकारार्थी |
| ३ | अर्जदार हि सिध्द करते काय की, ती गैरअर्जदारांकडुन स्त्रीधन परत मिळण्यास पात्र आहे ? | नाही. |
| ४ | अर्जदार हि सिध्द करते काय की, ती गैरअर्जदारांकडुन शारीरीक, मानसिक व आर्थीक छळाबाबत नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे ? | अंशत: होकारार्थी. |
| ५ | अर्जदार हि सिध्द करते काय की, ती गैरअर्जदारांविरूध्द संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे ? | नाही. |
| ६ | काय आदेश ? | अर्जदाराचा अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुददा क्र.१ च्या अनुषंगाने :</u>**

१३. लग्नानंतर ती गैरअर्जदारांकडे सुन म्हणुन नांदावयास गेली असता तीने गैरअर्जदारांच्या घरची संपुर्ण जबाबदारी स्वत:वर घेतली. ती गैरअर्जदारांचा यथोचित मानसन्मान करीत होती. गैरअर्जदारांनी तीला सुरूवातीचे दहा ते बारा दिवस चांगले वागविले. मात्र त्यानंतर गैरअर्जदार क्र. ३ हि तीला तुला स्वयंपाक करता येत नाही, घरातील कामे नीट करता येत नाही, तुझ्या आईने तुला शिकविले नाही काय अशी

सतत टोमणे मारायची. तसेच गैरअर्जदार क्र. ५ सुध्दा तीला लहान सहान कारणावरून तसेच तीच्या आई वडीलांवरून बोलत असे. गैरअर्जदार क्र. २ व ३ हे तीला तीच्या आई वडीलांनी लग्नात हुंडा दिला नाही म्हणुन माहेरहुन १,००,०००/– रूपये आणण्यासाठी तगादा लावत होते. गैरअर्जदार क्र. २ व ३ हे गैरअर्जदार क्र. १ ला तीच्याविरूध्द भडकावीत असे व गैरअर्जदार क्र. १ हा त्यावरून तीला मारहान करीत असे. गैरअर्जदारांच्या स्वभावात आज ना उद्या बदल पडेल या आशेने ती गैरअर्जदारांकडे नांदत होती.

१४. लग्न झाल्यापासुन गैरअर्जदार क्र. ५ हि माहेरीच राहत होती व ती सुध्दा गैरअर्जदार क्र. १ ला तीच्या विरूध्द भडकावीत होती व गैरअर्जदार क्र. १ हा तीला मारहान करीत असे व गैरअर्जदार क्र. ५ हिला आनंद होत असे. गैरअर्जदार क्र. ४ हा सुध्दा इतर गैरअर्जदारांना तीच्याविरूध्द भडकावीत असे. तीने सदरची बाब तीच्या आई वडीलांना सांगितल्यावर त्यांनी तीची समजुत काढली होती. गैरअर्जदार क्र. १ याने तीला तीच्या आई वडीलांनी तीला लग्नात दिलेली ५ ग्रॅम सोन्याची अंगठी घेवुन गेला. मात्र तीला सदर अंगठी परत न दिल्याने तीने दि. २०.०६.२०१९ रोजी गैरअर्जदार क्र. १ ला अंगठी बाबत विचारणा केली असता गैरअर्जदार क्र. १ ने तीला बेदम मारहान केली. सदरची बाब तीने तीच्या वडीलांना फोनवर सांगितली असता तीचे वडील सासरी आले व त्यांनी गैरअर्जदारांना मारहान का केली असे विचारले असता गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी जर तुमच्या मुलीला नांदावयाचे असेल तर १,००,०००/– रूपये घेवुन तीला पाठवा असे म्हणुन तीला तीच्या वडीलासोबत घरातुन हाकलुन दिले. तेव्हापासुन तर आजरोजीपर्यत ती तीच्या आई वडीलांच्या दयेवर तीच्या माहेरी राहत आहे. तीचे स्त्रीधन, सोन्याची अंगठी ५ ग्रॅम, सोन्याची पोत ७ ग्रॅम हे दागिने व तीला लग्नात मिळालेल्या संपुर्ण भेटवस्तु हया आजरोजी गैरअर्जदारांकडेच आहे. त्यानंर सुध्दा तीने व तीच्या वडीलांनी गैरअर्जदारांना समजविण्याचा अनेकदा प्रयत्न केला. तसेच तीचे वडील हे गुलाब तुकाराम वाघ व गोपाल बाळकृष्ण दिकुंडवार यांना घेवुन गैरअर्जदारांना समजविण्याकरीता अमदोरी येथे गेले असता गैरअर्जदारांच्या वागणुकीत कोणताही फरक पडला नाही व ते १,००,०००/– रूपयांच्या हुंडयांच्या मागणीवर ठाम राहिले.

१५. अर्जदार हिने तिच्या उलटतपासामध्ये ती गैरअर्जदार क्र. १ कडे नांदावयास तयार असल्याचे कबुल केले. मात्र तो मारझोड करीत असल्यामुळे ती वेगळी राहत असल्याचे तिने कथन केले. तीने तीच्या उलटतपासणीत हे जरी मान्य केले असले की, तीने आजपर्यंत गैरअर्जदारांविरूध्द कोणतीही पोलीस तक्रार दाखल केली नाही. तरी मात्र तीने तीला गैरअर्जदारांकडुन कोणताही त्रास नसल्यामुळे तीने

पोलीस तक्रार दिली नसल्याचे अमान्य केले. अर्जदार हिने तिच्या उलटतपासणीत हे सुध्दा मान्य केले की, तीचा विवाह गैरअर्जदारांकडे मौजा अमदोरी येथे झालेला आहे. मात्र तीने हे अमान्य केले की, लग्नाचा संपुर्ण खर्च गैरअर्जदारांनीच केला होता. गैरअर्जदारांच्या अधिवक्त्यांनी केलेल्या सर्व उत्तर सुचक प्रश्नांना अर्जदार हिने नकारार्थी उत्तरे दिली. तीने तिच्या उलटतपासामध्ये हे नाकारले आहे की, गैरअर्जदारांनी कधीही पैशाच्या अथवा इतर कारणांनी तीचा कधीही शारीरीक, मानसिक व आर्थीक छळ केलेला नाही.

१६. गैरअर्जदारांना वारंवार संधी देवुनही गैरअर्जदार हे त्यांचा पुरावा देण्यास असमर्थ ठरले. **मा. सर्वोच्च न्यायालय यांनी त्यांच्या विद्याधर वि. माणिकराव आणी इतर (१९९९ एस.सी.सी. ऑनलाईन एस.सी. २९४)** मध्ये असे प्रतिपादीत केले की, जर वादी किंवा प्रतिवादी साक्षीदाराच्या पिंज–यामध्ये हजर होवुन त्यांचा पुरावा देण्यास अपयशी ठरले. तर त्यांच्याविरूध्द प्रतिकुल अनुमान काढता येईल की, त्याने दाखल केलेला दावा किंवा त्याने प्रकरणात घेतलेला बचाव हा खोटा आहे.

१७. गैरअर्जदार हे त्यांचा पुरावा देण्यास असमर्थ ठरल्यामुळे त्यांनी सदर प्रकरणात घेतलेला बचाव सुध्दा ते सिध्द करण्यास अपयशी ठरलेले आहे. याउलट गैरअर्जदारांच्या बचावाला कोणताही फायदा होईल असा कुठलाही पुरावा गैरअर्जदार हे अर्जदार हिच्या उलटतपासणीत आणण्यास अपयशी ठरल्याचे दिसुन येते. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा साक्षीदाराच्या पिंज–यात देखील हजर होण्यास अपयशी ठरल्याचे दिसुन येते. अर्जदार हिने तिच्या पुराव्याच्या पुष्टर्थ अभिलेखावर कौटुंबिक घटना अहवाल दाखल केला असुन त्यामध्ये देखील गैरअर्जदारांनी तीला दिलेल्या शारीरीक, मानसिक व आर्थीक छळाचे विस्तृत वर्णन केल्याचे दिसुन येते. गैरअर्जदार हे त्यांचा पुरावा देण्यास अपयशी ठरल्यामुळे ते आपला बचाव सिध्द करण्यास अपयशी ठरल्याचे दिसुन येते. एकंदरीत गैरअर्जदारांनी अर्जदाराला शारीरीक, मानसिक व आर्थीक हिंसाचार केल्याचे अर्जदार हिने तिच्या पुराव्यामध्ये सिध्द केलेले आहे. करीता मी मुददा क्र. १ चे उत्तर होकारार्थी दर्शविलेले आहे.

**<u>मुददा क्र.२ च्या अनुषंगाने :</u>**

१८. मुददा क्र. १ च्या चर्चेवरून तसेच त्याला दिलेल्या उत्तरावरून असे सिध्द होते की, गैरअर्जदारांनी अर्जदार विरूध्द कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे. त्यामुळे अर्जदार हि गैरअर्जदार क्र. १ कडुन खावटी मिळण्यास पात्र आहे.

१९. गैरअर्जदारांच्या अधिवक्त्यांनी असा युक्तीवाद केला की, सदरचे प्रकरण प्रलंबित असताना अर्जदार हिने बेकायदेशीरपणे दुस–या व्यक्तीशी विवाह केल्यामुळे

ती गैरअर्जदार क्र. १ पासुन खावटी मिळण्यास कायदेशीररित्या पात्र नाही. मात्र अभिलेखाचे अवलोकन केले असता गैरअर्जदारांनी त्यांच्या लेखी जबाबामध्ये दुरूस्ती करून सदरचे कथन समाविष्ट केल्याचे दिसुन येत नाही. त्याचप्रमाणे गैरअर्जदारांना वांरवार संधी देवुनही ते पुरावा देण्यास अपयशी ठरल्याने सदरचे प्रकरण प्रलंबित असताना अर्जदार हिने बेकायदेशीररित्या दुसरे लग्न केल्याचे सिध्द करण्यास गैरअर्जदार अपयशी ठरले आहे. त्यामुळे गैरअर्जदारांच्या विद्वान अधिवक्त्यांच्या युक्तीवादामध्ये कोणतेही तथ्य असल्याचे आढळुन येत नाही.

२०. अर्जदार हि गैरअर्जदार क्र. १ ची पत्नी या नात्याने तिच्या पालनपोषनाची नैतिक व कायदेशीर जबाबदारी गैरअर्जदार क्र. १ ची आहे. अर्जदार हिने तीच्या पुराव्यामध्ये गैरअर्जदार क्र. १ हा खाजगी ठेकेदारीचा व्यवसाय करतो व तो दर महिन्याकाठी ५० ते ६० हजार महिना कमवितो, तसेच त्याच्या वडीलांच्या नावे असलेली मौजा अमदोरी येथील शेती सुध्दा करतो व त्यामधुन तो वार्षीक ३ ते ४ लाख रूपये नफा कमवितो, त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार हिला सहज मासिक २० हजार रूपये खावटी देवु शकतो, असे जरी कथन केले असले तरी तीने तीच्या उलटतपासामध्ये हे मान्य केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ रोजमजुरी करीत असुन त्याच्या उत्पन्नावर गैरअर्जदार क्र. २ ते ४ अवलंबुन आहे. तसेच अर्जदार हिने तिच्या कथनाच्या अथवा पुराव्याच्या पुष्टर्थ गैरअर्जदार क्र. १ चे उत्पन्न सिध्द करणारा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. मात्र अभिलेखावरून असे दिसुन येते की, गैरअर्जदार क्र. १ हा तरूण व्यक्ती असुन तो मजुरी करण्यास सक्षम असुन त्यामधुन उत्पन्न देखील मिळवीत आहे. एकंदरीत अर्जदाराची दैनंदिन गरज तसेच तिच्या वैद्यकीय उपचाराचा खर्च व इतर आवश्यक खर्च बघता अर्जदार हि गैरअर्जदार क्र. १ कडुन मासिक २,०००/– रूपये खावटी मिळण्यास पात्र आहे. सबब करीता मी मुददा क्र. २ चे उत्तर आंशिक होकारार्थी देत आहो.

**<u>मुददा क्र.३ च्या अनुषंगाने :</u>**

२१. अर्जदार हिने जरी तिच्या अर्जामध्ये व पुराव्यामध्ये कथन केले असले की, तिला लग्नात मिळालेले संपुर्ण दागिने व भेटवस्तु या गैरअर्जदारांच्या ताब्यात आहे. तरी त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदार अभिलेखावर सादर करण्यास अपयशी ठरलेली आहे. करीता मी मुददा क्र. ३ चे उत्तर नकारार्थी नोंदविले आहे.

**<u>मुददा क्र.४ च्या अनुषंगाने :</u>**

२२. अर्जदाराच्या अर्जाचे व पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते कि, अर्जदार हि गैरअर्जदारांकडुन कौटुंबिक हिंसाचाराची बळी पडलेली आहे.

त्यामुळे तिच्या शारीरीक व मानसिक स्वास्थावर विपरीत परीणाम झाल्याचे सुध्दा नाकारता येत नाही. करिता गैरअर्जदार हे अर्जदाराला नुकसान भरपाई देण्यास पात्र ठरतात. गैरअर्जदारांची आर्थीक परिस्थिती पाहता रुपये १०,०००/- ची नुकसान भरपाई पुरेशी होईल. सबब मुददा क्र.४ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदविण्यात येते.

**<u>मुददा क्र.५ च्या अनुषंगाने :</u>**

२३. अर्जदार हिने तिच्या अर्जामध्ये जरी गैरअर्जदारांविरूध्द संरक्षण आदेशाची मागणी केलेली असली तरी तिने तिच्या अर्जामध्ये व पुराव्यामध्ये कुठेही कथन केले नाही की, आजही गैरअर्जदार क्र. १ किंवा इतर गैरअर्जदार हे तिला तिच्या माहेरी येवुन अथवा फोनवर किंवा इतर कामाच्या ठिकाणी तिचा छळ करीत आहे अथवा तिला गैरअर्जदारांपासुन भीतीची भावना निर्माण झालेली आहे. करीता अर्जदार हि गैरअर्जदारांविरूध्द संरक्षण आदेश मिळण्यास अपात्र असल्याच्या निष्कर्षावर मी पोहोचलेलो आहो. करीता मी मुददा क्र. ५ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुददा क्र.६ साठीः</u>**

२४. वरील मुददयांची चर्चा व त्यावर मी माझा नोंदविलेला निष्कर्षानुसार अर्जदाराचा अर्ज हा अंशत: मंजुर करणे क्रमप्राप्त ठरते. त्याअनुषंगाने मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदाराचा अर्ज अशंत: मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ ला आदेशीत करण्यात येते कि, त्याने अर्जदार हिला दरमहा एकुण रक्कम रुपये २,०००/– (रुपये दोन हजार फक्त) पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन दयावी.

३. गैरअर्जदारांना असे आदेशीत करण्यात येते कि, त्यांनी अर्जदाराला शारीरीक व मानसिक त्रासासाठी रूपये १०,०००/–(रुपये दहा हजार फक्त) नुकसान भरपाई म्हणुन द्यावे.

४. अर्जदार हिची संरक्षण आदेशाची प्रार्थना नामंजुर करण्यात येते.

५. अर्जदाराची स्त्रीधन परतीची प्रार्थना नामंजुर करण्यात येते.

६. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

७. सदर आदेशाची एक प्रत पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन, घाटंजी यांना अग्रेषित करण्यात यावी.

८. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उदघोषित करण्यात आला.

PRAVIN RAMESH PATIL
Digitally signed by PRAVIN RAMESH PATIL
Date: 2026.05.22 15:20:56 +0530

( पी. आर. पाटील )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
घाटंजी, जि.यवतमाळ.

दिनांक :– २२.०५.२०२६.

| | |
|---|---|
| बहस ऐकल्याचा दिनांक | २२.०५.२०२६ |
| आदेश पारीत केल्याचा दिनांक | २२.०५.२०२६ |
| आदेश टंकलिखीत केल्याचा दिनांक | २२.०५.२०२६ |
| आदेशावर सही केल्याचा दिनांक | २२.०५.२०२६ |

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते कि सदर पि.डी.एफ. फाईलच्या आदेशातील मजकुर हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव- ए. एम. सुर्यवंशी (श्रेणी-३)